# लेख अग्रलेख

**प्रास्ताविक :**

वर्तमानपत्र हे जगातल्या महत्त्वाच्या घडामोडी आपल्या समोर घेऊन येत असते. वर्तमानपत्राचे आजचे रूप हे कालौघात विकसित झालेले रूप आहे. वर्तमानपत्रात लेख, अग्रलेख बातम्या अनेकविध सदरे, वाचकांची पत्रे, जाहिराती, जाहिर निवेदने, अशा प्रकारे माहिती ज्ञान, प्रबोधन आणि मनोरंजन असा मजकूर असतो.

प्रजासत्ताक गणराज्य म्हणून भारत देश अस्तित्वात आल्यानंतर चौथा आधारस्तंभ म्हणून वृत्तपत्रांकडे पाहण्यात येऊ लागले. म्हणून अनेकांनी या माध्यमाचा वापर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकासासाठी व समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी केला.

वृत्तपत्रात बातमीबरोबरच लेख आणि अग्रलेख महत्त्वाचे असतात.

**लेख :-** वृत्तावर आधारित लिखाण म्हणजे लेख होय. बातमीपेक्षाही वाचकाला आणखी माहिती देण्याची जेव्हा गरज भासते तेव्हा लेख लिहिले जातात. बातमी ही वस्तूस्थिती असते. तर लेख ही त्या वस्तुस्थितीवरील प्रतिक्रिया असते - समाजाच्या अनेकविध क्षेत्रातील व्यक्तींच्या म्हणण्याला आकार देण्याचे व्यासपीठ म्हणजे लेख होय. लेखाचे लेखन करणाऱ्याला सर्वच क्षेत्राचे समााभिमुख ज्ञान असावे लागते. तसेच जुन्यासह नवीन ज्ञानाची सांगड घालता यावी लागते.

**वृत्तपत्रीय लेख :**

वृत्तपत्रीय लेखनाचे ढोबळ मानाने तीन भाग पडतात. बातमी, अग्रलेख, व लेख. लेखामुळे वाचक बातमीचा आस्वाद घेऊ शकतो कारण बातमीत नसणारा भावनिक गुणांक लेखात आलेला असतो. घटितांचा भावनांनी मेळ घालून लेख लिहिले जातात.

**भाषिक विशेष :**

१) वृत्तपत्रात लिहिण्यात येणाऱ्या लेखाचे प्रयोजन व त्यांची तात्कालिकता यातून त्याची शैली व वृत्तपत्रीय भाषा घडत असते.

२) अग्रलेखाची भाषा ही वैचारिक निबंधाशी नाते सांगणारी प्रौढ व भारदस्त असते.

**अध्यापनाची पूर्वतयारी :**१) वेगवेगळया वर्तमानपत्रांमध्ये विविध विषयांवर आलेले लेख व अग्रलेख यांचा संग्रह करणे.

**शैक्षणिक साधने :**

१) वेगवेगळया वर्तमानपत्रांमध्ये विविध विषयांवर आलेल्या लेखांची कात्रणे.

**संदर्भ ग्रंथ :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर : अग्रलेख संग्रह :

**अध्यापन पद्धती :** व्याख्यान, स्पष्टीकरण, चर्चा.